**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधानसभेत लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवरून विरोधकांचा सभात्याग

- ST महामंडळासाठी भाडेतत्वावर बसगाड्या घेण्याच्या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- मॉरिशस बरोबर भारताचे अनेक सामंजस्य करार / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

**आणि**

- बीडचे आमदार सुरेश धस यांचा निकटवर्तीय आणि भाजपा कार्यकर्ता सतीश भोसले याला प्रयागराज इथून अटक

**<><><><><><>**

राज्यात ऑक्टोबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याआधी २ कोटी ३३ लाख ३३ हजार महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला, ही संख्या आता २ कोटी ४७ लाख झाल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. तसंच या योजनेच्या लाभार्थ्यांना २१०० रुपये मदत देण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल असं त्यांनी सांगितलं. आमदार रोहित पवार, वरुण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नमो सन्मान योजनेचा लाभ मिळणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार नाही असं तटकरे यांनी स्पष्ट केलं. मात्र अशा महिलांना एक हजार रुपये नमो सन्मान योजनेतून आणि पाचशे

रुपये लाडकी बहीण योजनेतून दिले जातील, असं त्या म्हणाल्या. भाजपाचे राम कदम यांनी याविषयी सांगितलं…

**होल्ड - राम कदम**

समाधानकारक उत्तर न मिळाल्याने प्रश्न विचारण्याची परवानगी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मागितली. मात्र विधानसभा अध्यक्षांनी ती फेटाळून लावत पुढचं कामकाज सुरू केलं. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली आणि सभात्याग केला.

**<><><><><><>**

टोरेस सारख्या गुंतवणूक कंपन्यांकडून देण्यात येणारं मोठा व्याज परतावा देण्याचं आश्वासन हा ९९ टक्के प्रकरणांमध्ये घोटाळा असतो, त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारची गुंतवणूक करू नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते.

शक्तीपीठ महामार्ग करायचा आहे मात्र लादायचा नाही, असं सांगत विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत चर्चेतून मार्ग काढून हा महामार्ग उभारला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली. या महामार्गाविरोधात कोल्हापुरातले शेतकरी आंदोलन करत असल्याचा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला होता, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका मांडली.

पीओपी मूर्ती बंदीच्या विरोधात आणि याबाबत स्पष्टता यावी यासाठी राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, या समितीचा अहवाल येईपर्यंत पीओपी मूर्तींसाठी परवानगी देण्याची विनंती न्यायालयाला करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. विरोधी

पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्थगन प्रस्ताव मांडत याबाबत शासनाची भूमिका मांडण्याची मागणी केली, त्याला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलं.

राज्य परिवहन महामंडळामार्फत भाडेतत्वावर बसगाड्या घेण्यासाठी निविदा प्रक्रियेचे कार्यादेश एसटी महामंडळाच्या स्तरावर संगनमत करून काढण्यात आले आहेत. या प्रकाराची एका महिन्यात चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. काँग्रेसचे राजेश राठोड यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते.

**<><><><><>**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त कराड इथं प्रीतीसंगम समाधी स्थळावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यावेळी उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिलेल्या आदर्श विचारांवर राज्य शासन काम करत असल्याचं पवार यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

अवैध कोळसाखाणी बंद करण्याची जबाबदारी राज्य सरकारांची असल्याचं आज केंद्र सरकारनं लोकसभेत सांगितलं. आसाममधे रॅटहोल कोळसाखाणींमधे झालेल्या अपघातात कामगारांचा मृत्यू झाल्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला केंद्रीय कोळसामंत्री जी. किशन रेड्डी उत्तर देत होते. या संदर्भात आपण आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्याशी चर्चा केली असून एकूणच कोळसाखाणींमधे अपघातांचं प्रमाण कमी करण्यासाठी केंद्रसरकार राज्यसरकारांशी संपर्कात आहे, असं ते म्हणाले. कोळसाखाणींमधली सुरक्षितता सर्वात महत्त्वाची आहे, झारखंड मधे बेकायदेशीर कोळसाखाणी बंद करण्यासंदर्भात तिथले मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी आपण बोललो असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या १० वर्षात देशातल्या दूध उत्पादनात साडे त्रेसष्ट टक्के वाढ झाली असल्याची माहिती दुग्धव्यवसाय विकास मंत्री राजीव रंजन सिंग यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली. दरडोई दुग्धसेवनाबाबत भारताचा जगात पहिला क्रमांक असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेत आज रेल्वे विषयी चर्चा सुरु झाली. भाजपाचे सामिक भट्टाचार्य यांनी चर्चेचा प्रारंभ करताना सांगितलं, अर्थसंकल्पात रेल्वेसाठी विक्रमी तरतूद करण्यात आली असून त्यामुळे रेल्वेचा कायापालट होणार आहे. वंदे भारत आणि अमृत भारत सारख्या गाड्यांनी वेग, क्षमता आणि आरामदायी प्रवासाचं नवं युग सुरु केलं आहे, असं ते म्हणाले. काँग्रेसचे अनिलकुमार यादव यांनी काँग्रेसच्या सत्ताकाळात रेल्वेचं जाळं आणि प्रवाशांसाठी सुविधा विकसित करण्याकरता झालेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारत आणि मॉरिशसमधल्या ऐतिहासिक नात्याचा हा सन्मान असल्याचे प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ या कार्यक्रमात त्यांना प्रदान करण्यात आला. मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम यांच्यासोबत त्यांनी आज प्रतिनिधी स्तरावर चर्चा केली. यावेळी स्थानिक चलनात देवाण घेवाण, कर्ज पुरवठा, राजदुतांसाठी प्रशिक्षण, बंदरातल्या व्यवसायाच्या माहितीची देवाणघेवाण, आर्थिक गुन्हे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात सहकार्य, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण यासारख्या विषयांवर ८ सामंजस्य करार दोन्ही देशात झाले. भारत आणि मॉरिशसमध्ये असलेल्या भागीदारीविषयी ते म्हणाले..

**होल्ड - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बाइट**

ग्लोबल साउथसाठी **MAHASAGAR** अर्थात **Mutual and Holistic Advancement for Security and Growth Across Regions** या उपक्रमाची घोषणा त्यांनी यावेळी केली. या अंतर्गत विकासासाठी व्यापार, शाश्वत वृद्धीसाठी क्षमता विकास, परस्पर सुरक्षा यावर भर दिला जाणार आहे. ग्लोबल साऊथ, हिंद महासागर आणि आफ्रिका खंडात मॉरिशसचं स्थान महत्त्वाचं आहे यावर संयुक्त निवेदनात प्रधानमंत्र्यांनी भर दिला. प्रादेशिक स्थैर्य आणि संपन्नतेसाठी भारत वचनबद्ध आहे. केवळ हिंद महासागराने नव्हे तर संस्कृती आणि परंपरेतूनही दोन्ही देश एकमेकांशी जोडले गेल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

बीडचे आमदार सुरेश धस यांचा निकटवर्तीय आणि भाजपा कार्यकर्ता सतीश भोसले याला महाराष्ट्र पोलिसांनी उत्तर प्रदेशच्या प्रयागराज इथून अटक केली आहे. गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. त्याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचे दोन, अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत एक आणि वन कायद्याअंतर्गत एक गुन्हा दाखल आहे. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातही भोसले याच्याविरोधात प्रकरणं प्रलंबित आहेत. त्याला आज बीडच्या न्यायालयासमोर हजर केलं जाईल. भोसले हा भाजपाच्या ‘भटके विमुक्त आघाडी’चा पदाधिकारी आहे.

**<><><><><><>**

क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत होणाऱ्या वेव्ज २०२५ परिषदेत सिम्फनी ऑफ इंडिया स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी ११२ संगीतकारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ८० शास्त्रीय संगीतकार तसंच लोककलाकारांची निवड करण्यात आली आहे.  दूरदर्शन आणि महावीर जैन फिल्म्स यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या उपक्रमाची अंतिम फेरी १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**//<><><><><><>//**